"महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५
सर्व महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) चार
सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार आरक्षण निश्चिती
करण्याबाबतचे आदेश २०२५"

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र. ४३/का-५
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू .चौक, मुंबई- ४०००३२.
ई मेल - sec.corp@mah.gov.in
दिनांक : २४ ऑक्टोबर, २०२५

संदर्भ :- १. महाराष्ट्र अधिनियम क्र.२१/२०२२, दि.११ मार्च, २०२२
२. महाराष्ट्र अधिनियम क्र.४३/२०२२, दि.८ सप्टेंबर, २०२२
३. महाराष्ट्र अधिनियम क्र.२३/२०२४, दि.१८ मार्च, २०२४
४. नगरविकास विभागाचे .एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४, दि.१० जून, २०२५ चे दोन स्वतंत्र आदेश व दि.२३ जून, २०२५ च्या दोन स्वतंत्र सुधारणा.
५. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०२५/ प्र.क्र.७/ का-५, दि. १६ जून, २०२५ चे आदेश व दि.३० जुलै, २०२५ ची सुधारणा.
६. नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.एमसीओ-२०२४/ प्र.क्र.१८१/ नवि-१४, दि. २० मे, २०२५ अन्वये प्रसिध्द केलेले नियम.

## आ दे श

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील तरतुदींनुसार:-

i) महानगरपालिका निवडणुकांचे अधिक्षण (superintendence), संचालन (direction) व नियंत्रणाचे (control) पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित (vested) केले आहेत.

ii) महानगरपालिकांच्या निवडणुका मुक्त (free), न्याय्य (fair) व पारदर्शक (transparant) वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

iii) महानगरपालिकेची मुदत संपण्यापूर्वी तेथे सार्वत्रिक निवडणूक घेणे बंधनकारक आहे.

**आणि ज्याअर्थी,** महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रभाग रचना करणे, आरक्षण ठरविणे, विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय विभाजन करणे आणि प्रत्यक्ष निवडणूक घेणे अशा चार प्रमुख टप्प्यांचा समावेश होतो व या चारही टप्प्यांच्या प्रक्रियेमध्ये विविध उप-टप्पे आहेत.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक-७/२०२२, दि. ०४/०८/२०२२ व महाराष्ट्र अधिनियम क्र.४३/२०२२, दि.८ सप्टेंबर, २०२२ अन्वये महानगरपालिकेमध्ये निवडून द्यावयाच्या किमान व कमाल सदस्यांची संख्या सुधारीत केली आहे;

**आणि ज्याअर्थी,** मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र.१९७५६/२०२१ व त्यासोबत संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५ व दि.१६/०९/२०२५ रोजी दिलेल्या निदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करणे बंधनकारक आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०६/०५/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशामध्ये नमूद केले आहे की, बांठीया आयोगाच्या सन २०२२ च्या अहवालापूर्वी महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गांना आरक्षण दिले जाईल.

**आणि ज्याअर्थी,** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.०६/०५/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने नगर विकास विभागाने दि.१०/०६/२०२५ व दि.२३/०६/२०२५ रोजीचे आदेशान्वये (संदर्भ क्र.४) निर्गमित केलेल्या आदेशानुसार व दि.१२/०६/२०२५, दि.२३/०६/२०२५ व दि.१४/०८/२०२५ च्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार २८ महानगरपालिकांची अंतिम प्रभाग रचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे.

**आणि ज्याअर्थी,** राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्रमांक क्र.एमसीओ-२०२४/ प्र.क्र.१८१/नवि-१४, दि. २० मे, २०२५ अन्वये चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार निवडणुका घेण्याकरीता "महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२५" निर्गमित केले असून त्यानुसार आरक्षण चक्रानुक्रमे

फिरविण्याच्या प्रयोजनार्थ आगामी होणारी निवडणूक ही पहिली निवडणूक म्हणून ग्राह्य धरण्याबाबत तरतूद केली आहे;

**आणि ज्याअर्थी,** मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ मध्ये दिलेले निर्देश, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील सुधारीत तरतुदी व नगर विकास विभागाने त्याअनुषंगाने निर्गमित केलेले नियम याच्या अनुषंगाने महानगरपालिकांच्या निवडणुकांकरिता आरक्षण निश्चित करण्याच्या अनुषंगाने आदेश देणे आवश्यक असल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे.

त्याअर्थी, मी, दिनेश वाघमारे, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमाच्या कलम १४ नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून महानगरपालिकांच्या (बृहन्मुंबई वगळून) सार्वत्रिक निवडणुकांकरिता चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणेबाबत पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

१. संक्षिप्त नाव:

या आदेशाला **"महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) सार्वत्रिक निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार आरक्षण) आदेश, २०२५"** असे संबोधिले जाईल.

२. अधिकार प्रदान:

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ अ मधील तरतुदीनुसार निवडणुकीकरीता प्रभागानुसार आरक्षण करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत आणि राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. रानिआ/ मनपा-२०२५ / प्र.क्र.७ / का-५, दि. १६ जून, २०२५ व दि.३० जुलै, २०२५ ची सुधारणा अन्वये सर्व महानगरपालिकांच्या बाबतीतील प्रभाग रचना करणे व आरक्षण निश्चितीचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडेच निहित आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या कार्यक्रमानुसार महानगरपालिका आयुक्त यांनी खालील कार्यवाही करावी:-

१. सार्वत्रिक निवडणूकीकरीता आरक्षित जागांची संख्या निश्चित करुन त्यास राज्य निवडणूक आयोगाची प्रथम मान्यता घ्यावी.

२. थेट आरक्षित होणाऱ्या जागांचे वाटप संबंधित प्रभागांमध्ये करावे.

३. प्रारुप आरक्षण सोडत काढून त्यावर हरकती व सूचना मागविण्याकरीता जाहिर सूचना द्यावी.

४. उर्वरित जागांचे आरक्षण सोडतीने निश्चित करावे.

५. सोडतीत निघालेले आरक्षण नेमून दिलेल्या पध्दतीने प्रसिध्द करुन त्यावर हरकती व सूचना मागवाव्यात.

६. प्राप्त हरकती व सूचनांचा काळजीपूर्वक विचार करुन अंतिम आरक्षणाची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करावी.

७. वरील सर्व कामकाजाची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची असेल.

लोकशाही मजबूत करण्यात महानगरपालिकांची भूमिका महत्वपूर्ण आहे त्यामुळे महानगरपालिका आयुक्त यांनी या निवडणुकांचे कामकाज पार पाडताना लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेणे आवश्यक आहे. ही जबाबदारी पार पाडताना निवडणुकांचे पावित्र्य राखणे आणि निवडणूक प्रक्रिया मुक्त, न्याय व पारदर्शक रितीने पार पडेल हे संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी पहाणे अत्यंत आवश्यक आहे.

३. **सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना :**

महानगरपालिकेस देय होणाऱ्या आरक्षित सदस्यांची संख्या प्रथम <u>परिशिष्ट-१</u> मध्ये दिलेल्या सूत्रानुसार करुन त्यानुसार एकूण सदस्य संख्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिलांकरीता आरक्षित जागांची संख्या निश्चित करावी.

प्रभागांमध्ये जास्तीत जास्त प्रभाग चार सदस्यांचे असून काही महानगरपालिकांमध्ये यथास्थिती तीन व पाच सदस्यांचे प्रभाग आहेत. जागांचे आरक्षण निश्चित करण्याच्या अनुषंगाने प्रभागातील प्रत्येक जागेस अ, ब, क, ड व इ या प्रमाणे जागा

क्रमांक देण्यात यावेत. उदा. प्रभाग क्र. ५ मध्ये चार जागा असतील तर त्या जागांचे क्रमांक ५-अ, ५- ब, ५-क व ५-ड याप्रमाणे होतील.

सोडत काढताना केवळ प्रभागांचे क्रमांक नमूद करुन सोडत काढण्यात यावी. प्रभागातील जागा आरक्षित झाल्यानंतर ती क्रमाने अ, ब, क व ड अशी नमूद करुन आरक्षित करण्यात यावी. उदा. प्रभाग क्र. १५ या ४ सदस्यांच्या प्रभागामधील जागा अनुक्रमे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती महिला, नागरीकांचा मागासवर्ग महिला व सर्वसाधारण याप्रमाणे निश्चित झाल्यास सदर जागांचे आरक्षण दर्शविताना त्या जागा क्र. १५-अ (अनुसूचित जाती), जागा क्र. १५-ब (अनुसूचित जमाती महिला), जागा क्र. १५-क (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला), जागा क्र. १५-ड (सर्वसाधारण) अशा प्रकारे जागांचे आरक्षण नमूद करुन दर्शविण्यात याव्यात.

४. **आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याकरिता पहिली निवडणूक :**

शासनाने अधिसूचना क्र.एमसीओ-२०२४/प्र.क्र.१८१/नवि-१४, दि. २० मे, २०२५ अन्वये रोजी प्रसिध्द केलेल्या "महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२५" च्या, नियम क्र. ७ नुसार आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ सदर निवडणूक ही पहिली निवडणूक आहे.

५. **अनुसूचित जातीकरीता आरक्षित प्रभाग निश्चित करणे:-**

अनुसूचित जातीच्या जागांच्या आरक्षणाचे वाटप हे शासनाने अधिसूचना क्र.एमसीओ-२०२४/प्र.क्र.१८१/नवि-१४, दि. २० मे, २०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२५ च्या, नियम क्र. ३ मधील तरतुदीनुसार करावयाचे आहे. याकरिता प्रभागातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची प्रभागाच्या एकूण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल, त्या प्रभागापासून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने सर्व प्रभागांची मांडणी **परिशिष्ट २** नुसार करण्यात येईल. त्यानंतर सदर नियमातील

तरतुदीनुसार उतरत्या क्रमाने अनुसूचित जातीसाठी निश्चित केलेल्या संख्येइतक्या प्रभागात अनुसूचित जातीची प्रत्येकी एक जागा वाटप करण्यात येईल.

६. अनुसूचित जमातीकरीता आरक्षित प्रभाग निश्चित करणे:-

अनुसूचित जमातीच्या जागांच्या आरक्षणाचे वाटप हे शासनाने अधिसूचना क्र.एमसीओ-२०२४/प्र.क्र.१८१/नवि-१४, दि. २० मे, २०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२५ च्या, नियम क्र. ४ मधील तरतुदीनुसार करावयाचे आहे. याकरिता प्रभागातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची प्रभागाच्या एकूण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल, त्या प्रभागापासून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने सर्व प्रभागांची मांडणी परिशिष्ट ३ नुसार करण्यात येईल. त्यानंतर सदर नियमातील तरतुदीनुसार सर्वाधिक टक्केवारी असलेल्या प्रभागापासून सुरूवात करुन उतरत्या क्रमाने अनुसूचित जमातीसाठी निश्चित केलेल्या संख्येइतक्या प्रभागात अनुसूचित जमातीची प्रत्येकी एक जागा वाटप करण्यात येईल.

७. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता एकच पद देय होत असल्यास - जर महानगरपालिकेच्या मागील ( म्हणजे यथास्थिती २०१५ ते २०१८ या कालावधीत झालेल्या) निवडणुकीत तसेच या निवडणुकीत एकच पद देय होत असेल आणि जर ते पद मागील निवडणुकीत त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असल्यास या निवडणुकीत ते पद त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित राहणार नाही. त्याचप्रमाणे जर मागील निवडणुकीत त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित नसेल तर या निवडणुकीत ते पद त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित होईल.

ज्या नवनिर्मित महानगरपालिकांमध्ये अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीकरिता एकच पद देय होत असल्यास, ते पद त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित होईल किंवा कसे हे सोडतीने निश्चित करण्यात येईल.

८. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे :-

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. ६ मे, २०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेमध्ये नागरिकांच्या मागसवर्ग प्रवर्गाकरीता एकूण देय जागांपैकी २७ टक्के जागा देय होतील. अशा प्रकारे नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांची गणना करताना अपूर्णांक आल्यास तो दुर्लक्षित करण्यात यावा.

नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरीता शासनाने अधिसूचना क्र.एमसीओ-२०२४/प्र.क्र.१८१ /नवि-१४, दि. २० मे, २०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२५ च्या, नियम क्र. ५ मध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा वाटप करण्याची पध्दत विहित केलेली आहे. सदर नियमातील तरतुदीनुसार प्रत्येक प्रभागात नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची एक अथवा अधिक जागा वाटप करण्यात येईल. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांची गणना करताना अपूर्णांक आल्यास तो दूर्लक्षित करण्यात यावा.

९. महिलांचे (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) आरक्षित प्रभाग निश्चित करणे:-

शासनाने अधिसूचना क्र.एमसीओ-२०२४/प्र.क्र.१८१ /नवि-१४, दि. २० मे, २०२५ रोजी रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२५ च्या, नियम क्र. ६ मध्ये अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला यांचे वाटप करण्याची पध्दत विहित केलेली आहे. त्यानुसार सदर प्रवर्गातील महिलांच्या जागांचे वाटप संबंधित प्रभागात करण्यात येईल.

१०. महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) आरक्षणाची सोडत काढणे :

शासनाने / महानगरपालिकेने अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द केल्यानंतर महानगरपालिका आयुक्तांनी, राज्य निवडणूक आयोगाकडून देय आरक्षणास मान्यता

मिळाल्यानंतर, नेमून दिलेल्या दिनांकास महानगरपालिका क्षेत्रामध्ये सभा आयोजित करून नागरिकांच्या समोर सोडत पध्दतीने अथवा यथास्थिती जागा नेमून देऊन, महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) राखीव जागांचे आरक्षण निश्चित करावे. सदस्य संख्या व आरक्षणाच्या परिशिष्ट- ४ मधील एकत्रित विवरणपत्रात निश्चित झालेले आरक्षण वेळोवेळी नमूद करावे.

१०.१ महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली सोडत काढावी.

१०.२ सोडतीचे स्थळ, वेळ व दिनांक यांना मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, महानगरपालिका मुख्यालय व प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड, वेब साईट, इत्यादी) आरक्षणाची सोडत व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी याकरिता वर्तमानपत्रात द्यावयाच्या सूचनेचा नमुना (मराठी व इंग्रजी) परिशिष्ट- ५ व ६ मध्ये देण्यात आला आहे.

१०.३ महानगरपालिका निवडणुकांकरीता आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्वे सोबतच्या परिशिष्ट- ७ मध्ये नमूद करण्यात आलेली आहेत.

१०.४ सोडतीचे योग्यप्रकारे इतिवृत्त लिहिण्यात यावे. इतिवृत्ताचा नमुना परिशिष्ट- ८ मध्ये देण्यात आलेला आहे.

११. प्रभागानुसार आरक्षणांची व्यापक प्रसिद्धी:

११.१ सोडतीनुसार आरक्षित झालेल्या जागांचा तपशील परिशिष्ट-९ मध्ये नमूद करावा.

११.२ प्रत्येक प्रवर्गातील महिलांच्या जागांची सोडत काढल्यानंतर निश्चित करण्यात आलेल्या जागांचे आरक्षण नमूद करुन आरक्षणाचे प्रारुप महानगरपालिका आयुक्त यांनी राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास प्रसिध्द करावे. (प्रसिध्दीचा नमुना परिशिष्ट-१० (मराठी) मध्ये देण्यात आलेला आहे.)

११.३ आरक्षणाची अधिसूचना व त्यावर हरकती व सूचना स्विकारण्याचा कालावधी व त्या कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांचा तपशील यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. ( उदा. वृत्तपत्रे, महानगरपालिका व प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड, वेबसाईट, इत्यादी)

१२. आरक्षणाबाबत हरकती व सूचना:

१२.१ आरक्षण सोडतीअंती नागरिकांना आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीची माहिती देण्यात येईल.

१२.२ हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीत नागरिकांकडून हरकती व सूचना स्विकारण्याची व्यवस्था महानगरपालिका कार्यालयात करण्यात येईल.

१२.३ हरकत किंवा सूचना दाखल केल्याची संबंधीतांना पोचपावती देण्यात यावी, ज्यामध्ये त्यांनी हरकत सादर करतानाचा दिनांक व वेळ नमूद केला जाईल.

१२.४ आलेल्या हरकती व सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे.

१२.५ प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांचा गोषवारा **परिशिष्ट-११** नुसार तयार करण्यात येईल.

१२.६ आरक्षणावर प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची योग्यरितीने दखल घेण्यात येईल, याची उपाययोजना महानगरपालिका आयुक्तांनी करावी. (उदा. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांची नोंदवही ठेवणे, हरकती कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांची निश्चिती, प्रत्येक हरकती व सूचनांना क्रमांक देणे, हरकतीचे स्वरुप नमूद करणे, इत्यादी)

१३. आरक्षणावर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर निर्णय घेणे-

१३.१ संबंधित महानगरपालिका आयुक्त, आरक्षणाबाबत प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर अधिनियम, नियम व राज्य निवडणूक आयोगाचे व मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश विचारात घेऊन त्या हरकती व सूचना त्यावर निर्णय घेऊन निकाली काढतील.

१३.२ हरकती व सूचनांवर निर्णय घेताना महानगरपालिका आयुक्त यांनी प्रत्येक हरकत व सूचनांची दखल घेऊन नियमाप्रमाणे योग्य ती वस्तूस्थिती नमूद करुन अभिप्राय देणे आवश्यक आहे.

१३.३ आरक्षणाची परिगणना अथवा वाटप यामध्ये कोणतीही चूक आढळल्यास त्याबाबतचे सविस्तर अभिप्राय नोंदवून महानगरपालिका आयुक्तांच्या मान्यतेने आरक्षण सुधारीत करण्याचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगास पाठवण्यात येईल व अंतिम प्रसिध्दीपूर्वी त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्यात येईल.

१३.४ आरक्षण निश्चितीबाबत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विचार करुन प्रभागनिहाय अंतिम आरक्षण परिशिष्ट-१२ मधील नमुन्यात महानगरपालिका आयुक्त यांनी शासन राजपत्रात प्रसिध्द करावे.

## १४ सर्वसाधारण

१४.१ भारताच्या संविधानाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रणाचे पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित केले आहेत. त्यामुळे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी अथवा महानगरपालिका आयुक्त यांना स्वतःहून आरक्षणाच्या कार्यक्रमात कोणताही बदल अगर स्थगिती देता येत नाही.

१४.२ राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग रचना व आरक्षण या विषयावर यापूर्वी काढलेले आदेशात काहीही म्हटले असले तरी, यापुढे होणाऱ्या सर्व निवडणूकांमध्ये केवळ " महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) सार्वत्रिक निवडणूक चार सदस्यीय प्रभाग रचनेनुसार आरक्षण) आदेश, २०२५ " या आदेशामध्ये केलेल्या तरतुदी लागू राहतील.

( दिनेश वाघमारे )
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

सहपत्र :-
सोबतच्या अनुक्रमणिकेत दर्शविल्यानुसार परिशिष्ट १ ते १२

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-२), मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
२. सर्व महानगरपालिका आयुक्त (बृहन्मुंबई वगळून)
३. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
४. आयोगातील सर्व कार्यासने
५. निवड नस्ती.

# परिशिष्टांची अनुक्रमणिका

| अ.क्र. | तपशिल | परिशिष्ट क्रमांक |
|---|---|---|
| १ | सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना. | परिशिष्ट - १ |
| २ | अनुसूचित जातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम. | परिशिष्ट - २ |
| ३ | अनुसूचित जमातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम. | परिशिष्ट - ३ |
| ४ | सदस्य संख्या व आरक्षणाचे एकत्रित विवरणपत्र. | परिशिष्ट - ४ |
| ५ | आरक्षण सोडत व प्रसिध्दी - जाहीर सूचनेचा नमुना- मराठी | परिशिष्ट - ५ |
| ६ | आरक्षण सोडत व प्रसिध्दी - जाहीर सूचनेचा नमुना- इंग्रजी | परिशिष्ट - ६ |
| ७ | आरक्षण सोडत काढण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे | परिशिष्ट - ७ |
| ८ | सोडतीच्या इतिवृत्ताचा नमुना | परिशिष्ट - ८ |
| ९ | सोडतीनुसार आरक्षित जागांचा तपशील | परिशिष्ट - ९ |
| १० | प्रभागनिहाय प्रारुप आरक्षण प्रसिध्दी, नमुना- मराठी | परिशिष्ट - १० |
| ११ | हरकती व सूचनांचा गोषवारा | परिशिष्ट - ११ |
| १२ | प्रभागनिहाय अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे. | परिशिष्ट - १२ |

## परिशिष्ट - १ (सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना)

-------------- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ----------(सन)

१. महानगरपालिका क्षेत्राची एकूण लोकसंख्या -
(लगतच्या जनगणनेनुसार)

२. अनुसूचित जातीची लोकसंख्या -
(लगतच्या जनगणनेनुसार)

३. अनुसूचित जमातीची लोकसंख्या -
(लगतच्या जनगणनेनुसार)

४. निवडून द्यावयाच्या महानगरपालिका -
सदस्यांची संख्या

५. अनुसूचित जातीकरीता राखून ठेवावयाच्या एकूण जागा -
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जातीची लोकसंख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times \text{एकूण सदस्य संख्या} )$$

**टीप :-** अनुसूचित जातीकरीता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० व त्यापेक्षा अधिक असलेला अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा.

६. अनुसूचित जमातीकरीता राखून ठेवावयाच्या एकूण जागा -
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जमातीची लोकसंख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times \text{एकूण सदस्य संख्या} )$$

**टीप :-** अनुसूचित जमातीकरीता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० व त्यापेक्षा अधिक असलेला अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा.

७. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या एकूण जागा -
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$( \text{सूत्र} = \frac{27}{100} \times \text{महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या} )$$

**टीप :-** नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना अपूर्णांक आल्यास तो दुर्लक्षित करण्यात यावा.

८. अ) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा -

$$( \text{सूत्र} = \frac{\text{एकूण सदस्य संख्या}}{2} )$$

ब) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागांची विभागणी

१.अनुसूचित जातीच्या स्त्रियांसाठी

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जातीची आरक्षित सदस्य संख्या}}{2} )$$

२. अनुसूचित जमातीच्या स्त्रियांसाठी

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जमातीची आरक्षित सदस्य संख्या}}{2} )$$

३. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या स्त्रियांसाठी

$$( \text{सूत्र} = \frac{\text{नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची आरक्षित सदस्य संख्या}}{2} )$$

४. सर्वसाधारण स्त्रियांसाठी उपलब्ध होणा-या उर्वरित जागा

( सूत्र = अ.क्र. ८ (अ) - [ अ.क्र.८ (ब१) + ८ (ब२)+ ८ (ब३)] )

टीप :- स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० व त्यापेक्षा अधिक असलेला अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा.

अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती करिता एकच जागा देय असल्यास स्त्रीयांचे आरक्षण निश्चित करतांना आदेशातील मुद्दा क्र. ७ नुसार गणना करावी.

९. अराखीव -

( सूत्र = अ.क्र. ४ - [ अ.क्र.५ + अ.क्र.६ + अ.क्र.७+ ८ ( ब ४ )] )

सही

आयुक्त, ...............

महानगरपालिका

| परिशिष्ट - २ (अनुसूचित जातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ..................... MUNICIPAL CORPORATION | | | | | | |
| STATEMENT SHOWING SCHEDULED CASTE DESCENDING ORDER | | | | | | |
| SR. No. | Ward No. | Total | SC | ST | SC% | RESVN |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही

आयुक्त, .........महानगरपालिका

| परिशिष्ट - ३ (अनुसूचित जमातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ………………… MUNICIPAL CORPORATION | | | | | | |
| STATEMENT SHOWING SCHEDULED TRIBE DESCENDING ORDER | | | | | | |
| SR. No. | Ward No. | Total | SC | ST | ST% | RESVN |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही
आयुक्त, ………महानगरपालिका

## परिशिष्ट ४ (सदस्य संख्या व आरक्षणाचे एकत्रित विवरणपत्र)

### महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक सन २०२५

| लोकसंख्या | | | सरासरी | |
|---|---|---|---|---|
| एकूण | अनुसुचित जाती | अनुसुचित जमाती | किमान | |
| | | | कमाल | |

| एकूण सदस्य संख्या व आरक्षण | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण सदस्य | अनुसुचित जाती | अनुसुचित जमाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण |
| | | | | |
| पैकी स्त्रियांसाठी आरक्षित पदे | | | | |
| | | | | |

| अ.क्र. | नवीन प्रभागाचा क्रमांक | एकूण लोकसंख्या | अनुसुचित जाती लोकसंख्या | अनुसुचित जमाती लोकसंख्या | अनुसुचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी | अनुसुचित जातीच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार उतरत्या क्रमाने अनुक्रमांक | अनुसुचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी | अनुसुचित जमातीच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार उतरत्या क्रमाने अनुक्रमांक | जागा क्रमांक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | अ | ब | क | ड |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

## परिशिष्ट ५

## ( सोडत व आरक्षण प्रसिध्दी - जाहीर सूचनेचा नमुना-मराठी)

----------महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -------

जाहीर सूचना

---------- महानगरपालिकेच्या सन ---- मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे, तसेच आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करून हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | वार ---------<br>दिनांक ---------<br>सकाळी ------- वा.<br>स्थळ - ----------<br>------------ |
| २ | आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक | -----वार, दिनांक ------ |
| ३ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | -----वार, दिनांक --------- ते<br>-----वार, दिनांक ---------<br>(दुपारी ३.०० वा.पर्यंत) |
| ४ | हरकती व सूचना | महानगरपालिका मुख्यालय, निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर करावयात |
| टीप : दाखल झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन आरक्षणाची अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यात येईल. | | |

ठिकाण :-------------

आयुक्त,

दिनांक :-------------

--------महानगरपालिका

परिशिष्ट ६

(सोडत व आरक्षण प्रसिध्दी - जाहीर सूचनेचा नमुना-इंग्रजी)

## --------------------- MUNICIPAL CORPORATION
## GENERAL ELECTION ------------- (Year)

**PUBLIC NOTICE**

**For the General Election of ---------------------- Municipal Corporation to be held in the year ----------,The Programme for the Draw of lots for reservation of seats in the category of the Scheduled Caste (women), Scheduled Tribes (women), Backward Class of Citizens, Backward Class of Citizens (Women) & Women from General Category and for the publication of reservation is as below.**

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of the Draw for the reservation | Date -----------<br>At --------- a.m<br>Place ----------------------<br>----------------------<br>---------------------- |
| 2 | Date of publishing the draft of reservation | --------day, Date – -------------- |
| 3 | Last date of submitting Objections & Suggestions | ----------day, Date----------------<br>to<br>----------day,Date-----------------<br>(upto 3.00 p.m.) |
| 4 | Place where Objections & Suggestions are tobe filed. | Municipal Head office, Election Office or concerned ward Office |
| Note : After considering all Objections & Suggestions, final notification of reservation will be published. | | |

**Place :-** **Commissioner,**

**Date :** **------------Municipal Corporation**

# परिशिष्ट ७

## (महानगरपालिका निवडणूकांकरीता आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे)

१. महानगरपालिकेच्या आरक्षणाची सोडत राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिवशी काढण्यात यावी.

२. सोडतीच्या तीन ते चार दिवस अगोदर सोडतीची रंगीत तालीम निश्चितपणे करण्यात यावी.

३. सोडतीचे इतिवृत्त लिहिण्यात यावे.

४. सोडत महानगरपालिका आयुक्त यांच्या उपस्थितीत पार पाडण्यात यावी.

५. सोडतीसाठी व प्रारुप आरक्षणाच्या प्रसिध्दीसाठी करावयाच्या जाहिर सूचनेचा नमुना राज्य निवडणूक आयोगाने परिशिष्टांमध्ये विहित केल्यानुसार राहील. ही सूचना सोडतीच्या दोन/तीन दिवस आधी किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

६. सोडतीसाठी पारदर्शक ड्रम वापरण्यात यावा.

७. ड्रममध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार कमीत कमी A4 या आकाराचा असावा.

८. चिठ्ठी प्लास्टीक पाईपचा वापर करून एकाच आकारात रोल करावी. त्यानंतर पाईप काढून त्यावर रबर बॅण्ड लावावा. लावण्यात येणारे रबर बॅण्ड एकाच रंगाचे असावेत व ते चिठ्ठीच्या मध्यभागी लावावेत.

९. सोडतीच्यावेळी सर्व प्रभाग दर्शविणारा एकत्रित नकाशा तसेच प्रत्येक प्रभागाचा हद्दी दर्शविणारा स्वतंत्र नकाशा ठळकपणे दिसेल अशारितीने लावून ठेवावा. प्रत्येक प्रभागाच्या सीमा सोडतीच्या वेळी स्पष्ट करण्यात याव्यात.

१०. सोडत शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात यावी.

११. कोणत्या पदांच्या आरक्षणाची सोडत कोणत्या प्रभागातून कशाप्रकारे काढण्यात येणार आहे याची सविस्तर माहिती दर्शविणारे पत्रक तयार करून सर्व उपस्थितांना सोडतीपूर्वी वाटण्यात यावे तसेच त्याला पुरेशी प्रसिद्धी देण्यात यावी.

१२. सोडतीमध्ये आलेला जागा क्रमांक प्रोजेक्टरद्वारे मोठया पडद्यावर दर्शविण्यात यावा.

१३. संपूर्ण सोडत प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात यावे.

१४. सोडतीचे प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.

१५. नागरिकांना सविस्तर माहिती देण्यासाठी एक प्रसिद्धीपत्रक तयार करुन त्यास पुरेशा आधी खाली नमूद केल्याप्रमाणे व्यापक प्रमाणावर प्रसिद्धी देण्यात यावी.

i) महानगरपालिकेच्या सूचना फलकावर

ii) महानगरपालिका प्रभाग समितीच्या सूचना फलकावर

iii) महानगरपालिकांच्या इतर कार्यालयांमध्ये सूचना फलकावर

iv) स्थानिक केबल टिव्हीवर

v) फ्लेक्स बोर्ड तयार करून शहरात मुख्य ठिकाणी लावण्यात यावेत.

.................

# परिशिष्ट - ८

## सोडतीच्या इतिवृत्ताचा नमुना

आज दि. -------- रोजी सकाळी / दुपारी ----------- वाजता ------------ महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी यथास्थिती थेट अथवा चिठ्ठ्या टाकून जागांचे आरक्षण निश्चित करण्याची कार्यवाही शासनाने दि २० मे, २०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या नियमानुसार खालीलप्रमाणे करण्यात आली :-

१. प्रथम उपस्थित सर्व प्रतिनिधी / नागरिक यांना महानगरपालिका निवडणुकीसंबंधी खाली नमूद केल्याप्रमाणे सविस्तर माहिती देण्यात आली :-

१) प्रभागांची संख्या- चार सदस्यीय प्रभाग संख्या तसेच यथास्थिती तीन व पाच सदस्यीय प्रभाग संख्या.

| एकूण सदस्य संख्या | | अनु.जाती | | अनु. जमाती | | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | | सर्वसाधारण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | स्त्रिया | एकूण | स्त्रिया | एकूण | स्त्रिया | एकूण | स्त्रिया | एकूण | स्त्रिया |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

२. सोडतीकरिता --------------- शाळेतील खालील लहान मुले / मुली उपस्थित होत्या :-

१) ------------------------------------

२) ------------------------------------

३) ------------------------------ याप्रमाणे

सदर मुलांच्या हस्ते पुढील सोडती काढण्यात आल्या.

३. **महानगरपालिकेत तीन सदस्यांचे दोन प्रभाग असल्यास:-** दि. २० मे, २०२५ च्या नियमातील नियम क्र. ६ (अ) नुसार तीन सदस्यांचे दोन प्रभाग असल्यास प्रथम त्या दोन प्रभागांपैकी कोणत्या प्रभागात महिलांच्या दोन जागा येतील व कोणत्या प्रभागात एक जागा राहिल हे सोडतीने निश्चित करण्यात आले. असे करताना तीन सदस्य असलेल्या दोन्ही प्रभागाच्या चिठ्ठ्या टाकल्या असता त्यापैकी सोडतीत----- या प्रभागाची चिठ्ठी आली. त्यामुळे ----- या प्रभागात दोन जागा महिलांसाठी आरक्षित होतील. शिल्लक राहिलेल्या---- या प्रभागात एक जागा महिलांकरीता आरक्षित होईल.

( तीन सदस्यांचा एकच प्रभाग असल्यास अशी सोडत घेण्याची आवश्यकता नाही. त्या प्रभागात तीनपैकी दोन जागा महिलांकरीता आरक्षित राहतील )

४.  **अनुसूचित जाती महिलांची सोडत :-** अनुसूचित जातीकरिता ------- जागा आरक्षित असून लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने आरक्षित असलेल्या प्रभागांमधून अनुसूचित जातीच्या महिलांकरिता ---------- प्रभाग सोडतीने खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले :-

| सोडतीकरिता उपलब्ध असणारे अनुसूचित जातीच्या प्रभाग क्र. व जागा क्र. | सोडतीमध्ये अनुसूचित जातीच्या महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभाग क्र. व जागा क्र. |
|---|---|
| | |

५.  **अनुसूचित जमाती महिलांची सोडत :-** अनुसूचित जमातीकरिता ------- जागा आरक्षित असून लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने आरक्षित असलेल्या प्रभागांमधून अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता ---------- प्रभाग सोडतीने खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले :-

| सोडतीकरिता उपलब्ध असणारे अनुसूचित जमातीच्या प्रभाग क्र. व जागा क्र. | सोडतीमध्ये अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभाग क्र. व जागा क्र. |
|---|---|
| | |

६.  **नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग सोडत :-** नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता ---- जागा आरक्षित असून त्यांचे वाटप शासनाने दि. २० मे, २०२५ रोजी केलेल्या नियमातील नियम क्र. ५ (अ) व (ब) मधील तरतूदीनुसार संबंधित प्रभागात थेट करण्यात आले आहे. उर्वरित आरक्षण सोडतीने खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले.

| नियमातील तरतूदीनुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता थेट आरक्षित झालेले प्रभाग क्र. व जागा क्र. | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या सोडतीकरिता उपलब्ध असणारे प्रभाग क्र. | सोडतीमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित झालेल्या प्रभाग क्र. व जागा क्र. |
|---|---|---|
| | | |
| | | |

७.  **नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला सोडत :-** नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता ---- जागा आरक्षित असून त्यांचे वाटप शासनाने दि. २० मे, २०२५ रोजी केलेल्या नियमातील नियम क्र. ६ मधील तरतूदीनुसार आणि परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेल्या प्रभागांमधून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरिता --------- प्रभाग थेट / सोडतीने खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले :-

( नियम क्र. ६ (१) (अ) व (ब) मध्ये नमूद केलेले महिलांचे प्रमाण राखण्याच्या दृष्टीने काही प्रभागांमध्ये नियम क्र.६(३) नुसार ना.मा.प्र. महिलांचे थेट आरक्षण द्यावे लागेल अथवा प्रभागातील महिलांचे आरक्षण पूर्ण झाले असल्यास ते प्रभाग वगळावे लागतील )

| ना.मा.प्रवर्गातील महिलांकरीता थेट आरक्षित होणारे प्रभाग क्र. व जागा क्र. (असल्यास) | सोडतीकरिता उपलब्ध नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा असणारे प्रभाग क्र. | सोडतीमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभाग क्र. व जागा क्र. |
|---|---|---|
| | | |

८. <u>सर्वसाधारण महिलांच्या जागा नेमून देणे</u>:- यथास्थिती अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिलांच्या जागा निश्चित झाल्यानंतर प्रत्येक प्रभागात उपरोक्त नियम क्र. ६ (१) (अ) व (ब) मधील तरतुदीनुसार प्रभागातील एकूण महिलांच्या जागा खालीलप्रमाणे ठेवणे आवश्यक आहे.

अ) चार जागा असलेल्या प्रभागात दोन जागा महिलांसाठी

आ) पाच जागा असलेल्या प्रभागात तीन जागा महिलांसाठी

इ) तीन जागांचा एकच प्रभाग असल्यास त्या प्रभागात दोन जागा महिलांसाठी

ई) तीन जागांचे दोन प्रभाग असल्यास वरील मुद्दा क्र. ३ नुसार यथास्थिती दोन अथवा एक जागा महिलांसाठी आरक्षित होते.

महिलांचे वर नमूद केलेले प्रमाण पूर्ण करण्यासाठी सर्वसाधारण महिलांच्या जागा त्या प्रमाणात नेमून देण्यात आल्या, त्या खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | प्रभाग क्र. | सर्वसाधारण महिलांकरीता आरक्षित जागा क्र. |
|---|---|---|
| | | |
| | | |

वरीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरुन उपस्थित मुलांच्या हाताने उपस्थित सर्व नागरिक / प्रतिनिधी यांचे समक्ष चिठ्ठ्या काढण्यात आल्या, अथवा यथास्थिती नियमातील तरतुदी विचारात घेऊन आरक्षित प्रभाग थेट निश्चित करण्यात आले. त्यानुसार सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जागा निश्चित करण्यात आल्या.

वरीलप्रमाणे चिठ्ठ्या टाकण्याची कार्यपध्दती सर्व उपस्थित नागरिक / प्रतिनिधी यांचे समक्ष पूर्ण करण्यात आली. त्यानंतर प्रभागनिहाय बिनराखीव जागांचा तपशिल देण्यात आला. आरक्षणाबाबत, थेट अथवा सोडत पध्दतीनुसार निश्चित केलेल्या प्रभागनिहाय जागेबाबत तसेच आरक्षणाच्या अनुषंगाने अन्य कोणतीही काहीही तक्रार असल्यास प्रारुप आरक्षण प्रसिध्द झाल्यानंतर विहित कालावधीत

हरकती व सूचना दाखल करण्याची माहिती देण्यात आली. वरीलप्रमाणे कामकाज पूर्ण करण्यात येऊन उपस्थित सदस्य / नागरिकांचे / प्रतिनिधींचे आभार मानून विषयांकीत सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

आयुक्त
----------- महानगरपालिका.

दिनांक:

उपस्थितांची यादी

| अ.क्र. | उपस्थिताचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| | | |
| | | |

टीप:

(१) सभेत द्यायच्या माहितीमध्ये प्रथम कोणत्या सालाची जनगणना विचारात घेतली ते वर्ष, जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या, अ.जा. व अ.ज. ची लोकसंख्या, देय सदस्य संख्या, देय प्रभाग, देय प्रभागनिहाय सदस्य संख्या, देय आरक्षित जागांची संख्या याची माहीती देण्यात यावी.

(२) यानंतर उतरत्या क्रमाने आरक्षित झालेल्या अ.जा. व अ.ज. जागांची माहिती द्यावी.

(३) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता नियमातील तरतूदीनुसार आरक्षित झालेल्या जागांची माहिती द्यावी.

(४) यानंतर प्रभागनिहाय राहिलेल्या जागांमधून कोणत्या प्रवर्गाचे सोडतीने किती चिठठया काढावयाच्या आहेत याबाबत माहिती देवून सोडतीची तयारी करावी.

परिशिष्ट ९

( सोडतीनुसार आरक्षित झालेल्या जागांचा तपशील )

महानगरपालिकेचे नाव: सोडतीचा दिनांक:

एकूण जागांचा तपशील.

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित जागांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | | |
| ४ | सर्वसाधारण | | |
| एकूण | | | |

प्रभागातील जागानिहाय आरक्षणाचा तपशील.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | १-अ | |
| २ | | १-ब | |
| ३ | | १-क | |
| ४ | | १-ड | |
| ५ | २ | २-अ | |
| ६ | | २-ब | |
| ७ | | २-क | |
| ८ | | २-ड | |
| याप्रमाणे... | | | |

सही/-

महानगरपालिका आयुक्त

---------- महानगरपालिका

## परिशिष्ट-१०

### ( प्रभागनिहाय प्रारुप आरक्षण प्रसिध्दी, नमूना-मराठी )

### --------- महानगरपालिका

------ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक- .......... करिता क्रमांक ------ दि. - -------- अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेमधील प्रत्येक प्रभागातील जागानिहाय आरक्षण खालीलप्रमाणे राहील :-

एकूण जागांचा तपशील.

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित जागांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | | |
| ४ | सर्वसाधारण | | |
| | एकूण | | |

प्रभागातील जागानिहाय आरक्षणाचा तपशील.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | १-अ | |
| २ | | १-ब | |
| ३ | | १-क | |
| ४ | | १-ड | |
| ५ | २ | २-अ | |
| ६ | | २-ब | |
| ७ | | २-क | |
| ८ | | २-ड | |
| याप्रमाणे... | | | |

दि.------ रोजीच्या जाहिर सूचनेत नमूद केल्यानुसार आरक्षणाबाबत काही हरकती व सूचना असल्यास त्या दि.----------ते---------या कालावधीत महानगरपालिका मुख्यालय, निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात.

महानगरपालिका आयुक्त

-----------

महानगरपालिका.

परिशिष्ट-११

## प्रारुप आरक्षणाबाबत प्राप्त हरकती व सूचनांचा गोषवारा

----------- महानगरपालिका

हरकतींचा कालावधी दि. ----------- ते ----------- पर्यंत

| अ. क्र. | हरकतदाराचे नाव | हरकतीचे स्वरुप | संबंधित प्रभाग क्रमांक (असल्यास) | वस्तूस्थिती | महानगरपालिका आयुक्तांचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |

उपायुक्त (निवडणूक)

आयुक्त
------- महानगरपालिका

## परिशिष्ट- १२

## ( प्रभागनिहाय अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे )

## अधिसूचना

क्रमांक .................... ज्याअर्थी; नगर विकास विभागाने दिलेल्या कार्यक्रमानुसार .......... महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रभाग रचनेची अंतिम अधिसूचना क्र. .................., दि. ........... अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने क्र. .......... दि. ....... च्या पत्रान्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गच्या आरक्षणास मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने क्र. ............ दि. ............. च्या आदेशान्वये आरक्षण सोडत काढून त्याची अंतिमरित्या प्रसिध्दी करण्याचे अधिकार संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान केले असून सदर आदेशास अनुसरून दि.------ रोजी दिलेल्या कार्यक्रमानुसार .......... महानगरपालिकेच्या आरक्षित प्रभागांची जाहीर सोडत दि. ....... रोजी काढण्यात आली व प्रभागनिहाय आरक्षण प्रसिध्द करुन त्यावर दि. ....... ते .......... या कालावधीमध्ये हरकती व सूचना मागविण्यात आल्या.

आणि त्याअर्थी; मी ................आयुक्त, ............ महानगरपालिका यासंदर्भात प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा काळजीपूर्वक विचार करुन राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचना क्र. ................... दि. ............ अन्वये ............ महानगरपालिकेच्या संदर्भात शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या निवडणूक प्रभागांमध्ये पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ पुढीलप्रमाणे आरक्षण राहिल असे अधिसूचित करीत आहे :-

## एकूण जागांचा तपशील.

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित जागांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | नागरिकाचा मागासवर्ग प्रवर्ग | | |
| ४ | सर्वसाधारण | | |
| | एकूण | | |

## प्रभागनिहाय आरक्षणाचा तपशील.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | १-अ | |
| २ | | १-ब | |
| ३ | | १-क | |
| ४ | | १-ड | |
| ५ | २ | २-अ | |
| ६ | | २-ब | |
| ७ | | २-क | |
| ८ | | २-ड | |
| याप्रमाणे... | | | |

ठिकाण

दिनांक

आयुक्त,

----------- महानगरपालिका.